

श्रीगणेश उत्सवानिमित्त

# राष्ट्रैक्यसाधन

## मेळ्याचीं पदें.

शके १८४४

लेखक व प्रकाशक

रा. भिकाजी नारायण जोगदेव पुणें पेठ
शुक्रवार घ. नं. २०

मुद्रक

शंकर नरहर जोशी १२६ सदाशिव पेठ
पुणें सिटी

किंमत दीड आणा.

# विषयानुक्रमणिका.


| अनुक्रम | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ | श्रीगणेश वंदन | १ |
| २ | वार्षीक भेट | १ |
| ३ | प्रेमळ भजन पद्य | १ |
| ४ | विसर्जन समईची प्रार्थना | २ |
| ५ | स्वातंत्र्य मागणी | २ |
| ६ | निर्वाणीची प्रेमळ मागणी | ४ |
| ७ | शपथ | ५ |
| ८ | खरा मार्ग | ५ |
| ९ | गरीब प्रजा व स्वार्थी सरकार | ६ |
| १० | पारतंत्र मुक्ती | ७ |
| ११ | व्हॉ. रेडिंग यांचा न्यायाचा काटा | ७ |
| १२ | जाती व वर्ण भेद बखेडा मोडणे | २ |
| १३ | भक्ति प्रेमानें ऐक्य करून स्वराज्य मिळविणें | ११ |
| १४ | लो. टिळकांचे हेतू पूर्ण कां करावे ? | १२ |
| १५ | विजया दशमी उर्फ दसरा | १५ |

श्रीगणेशायनमः

शके १८४४ सालांतील श्रीगणेशउत्सवासाठीं मेळ्याची पदें.

## ईशप्रार्थना.

पद १ ले. चाल—स्वार्थी प्रीति मनुजाची सहज ती.

प्रीतीऽही प्रणति चरणासी गणपती ॥ धृ० ॥ चरणासी० ॥
निराकार तुज निर्गुण ईशा, मुळारंभि चिंतीऽऽ ॥ प्रीती० ॥ १ ॥
ॐकार श्रीमंगलदायक, स्मरतां अघ हरतीऽऽ॥ प्रीती० ॥ २ ॥
भालचंद्र, हेरंब, विघ्नहर, मयुरेश्वर, मूर्तीऽऽ॥ प्रीती० ॥ ३ ॥
वक्रतुंड, गजशुंडलंबशुभ, एकदंत, वदतीऽऽ॥ प्रीती० ॥ ४ ॥
ऋद्धिसिद्धी वरद विनायक, गाउनि जन रमतीऽऽ॥ प्री० ॥ ५ ॥
बुद्धीचालक, चिंतामणि तूं सकला दे सुमतीऽऽ॥ प्री० ॥ ६ ॥
भो पिंगाक्षा शांति [स्वराज्य] सुख दे हरुनी भव (पर) भ्रांतीऽऽ ॥७॥
नामे तारकें नारो बालक वदनी घे भक्तीऽऽ॥ प्रीती० ॥ ८ ॥

---

पद २ रें. चाल—टकमक पाहीं सूर्य रजनिमुख.

पुनरपि दर्शन वर्षादिनीं तव । बाल बाल आम्हि चरणकमलिं—
प्रभो ठेवितसों निज भाल भाल हें । पुनरपि० ॥ ध्रु० ॥
तुजवरि सारा भारचि, हिंदजन देत, भक्तहेत, झणिं पुरवें
सकल ॥ हें पुनरपि दर्शन वर्षादिनीं तव० ॥ १ ॥

—०—

पद ३ रें चाल—प्रभु एक जगतीं त्राता०

मनमोहन मंगलधामा—। पदिं भाव अन्तरिं प्रेमा ॥ धृ० ॥
प्रथमारंभीं ध्यान वंद्य हें । सुरवरमुनि विश्रामा रे ॥ मन० ॥ १ ॥
विघ्नविनायक कल्पद्रुम हा । सकल पूर्ण करि कामा रे ॥ मन० ॥ २ ॥

मूर्ती रमणिय नयनमनोहर । पाहुनि पावुं अरामा रे ॥ मन० ॥ ३ ॥
उत्सवदिनिं ह्या गाऊं नाचूं । शांतवुं आत्मारामा रे ॥ मन० ॥ ४ ॥
स्वार्थसाधु हे व्यर्थ माजविती, जातीद्वेष रिकामा रे ॥ मन० ॥ ५ ॥
हा राष्ट्रक्षय दूर करूं झणिं । तन मन धन आणूं कामा रे ॥ मन० ॥६॥
अपस्वार्थी प्रभो दुर्जन संहरीं । रक्षीं पतितां दिना रे ॥ मन० ॥ ७ ॥
राष्ट्राज्ञा ही सकल पाळुया । सांगति गांधि महात्मा रे ॥ मन० ॥८॥
स्वदेशकार्या करितां आर्या । घेऊं प्रभुच्या नामा रे ॥ मन०.॥ ९ ॥

—०—

### पद ४ थें. चाल—पुनरपिनयना ती तनु०

पुनरपि येई हो गणराया । हिंद जनांची विनती सदया । प्रेमें तव पाया ॥ पुनरपि ॥ धृ० ॥ दशादिनीं उत्सविं इच्छा व्यक्ताचि । केल्या तरि दे स्वराज्य प्राप्ती । आस ( शांति ) दुजी नच मोरया ॥ पुनरपि० ॥ १ ॥

—०—

### पद ५ वें. चाल—" भूपती खरें तें वैभवसुख सेवीती "

श्रीमंगलमूर्ती विघ्नहरा तुज प्रणती ।
झणिं हिंद स्वतंत्रचि करुनी दे सुखशांति ॥ धृ० ॥
आज लोटुनि गेलीं शत संवत्सर पुरतीं ।
ह्या परवशतेची आली प्रभो बहु खंती ॥
करिं कृपा लौकरी आतां । ईश्वरा ।
तुज विण न कोणी त्राता । ईश्वरा ।
अति जाचक हो परसत्ता । ईश्वरा ।
तुज करुणासागर भक्तदयाघन म्हणती ।
मग हिंद जनांची कां न दया ये तुज ती ॥ श्री० ॥ १ ॥
आज हिंद जनाविण स्वतंत्र सारी जगती ।
म्हणुनियां तयांची झालि प्रभो बहु प्रगती ॥

जे आर्य आम्हि हे होतों सर्वांपुढती ।
पर सत्तेनें अज आली हीन स्थिति ॥
किती हिंदवैभव विलसत होतें जगती ।
तें फस्त करुनि हें परके मस्ताचि होती ॥
भुलथापें भोळे हिंदी । भुलावेले ।
हे विद्यावैभव हिंदी । पळविलें ।
बहु अमीष दाउनि हिंदी । फसविले ।
हे भेदनीतिनें मवाळ धरुनी हातीं ।
यद्यपी हिंदिची लूट करिती परस्वार्थी ॥ श्री० ॥ २ ॥
जी कला कुशलता हिंद जनीं बहु होती ।
परयंत्रसाधनें लयास गेली पुरती ॥
आज हिंद खची करावया बहु रीती ।
पर, जुल्मी कायदे नित्य नवीन बनबीती ॥
जरि रेल्वे तारायंत्रें सोइ ह्या दिसती ।
परि हिंद जनांते बंधनकारक असती ॥
आज सुधारणेच्या ढोंगा । खालतीं ।
बघ गुलाम हिंदी लोकां । बनाविती ।
पर कुटील न्याय हि नीती । सांप्रती ।
नि:शस्त्र करुनी हिंद जनांते पिळिती ।
प्रभो धांव पावरेऽबघसी अंत किती ॥ श्री० ॥ ३ ॥
आज दिव्य औषधी हिंदींताचि ह्या असती ।
परि डॉक्टर सारे दलाल होउनि जगती ॥
बघ तसेच बी. ए. एम्. ए. परिक्षा देती ।
परि परावलंबी, सत्ता परक्यां हातीं ॥
असे हिंद सुशिक्षित अर्धपोटि किति मरती ।
पर, पगार दसपट घेउनि चैनी करिती ॥
तो लोकमान्य नर कोठें ? । केसरी ।

तो धुरीण रग जिरवीता । अजि पुरी ।
हीं नोकरशाही सऽत्ता । संहरी ।
तत्समान हिंदी सुपुत्र सकलचि होती ।
तरि स्वराज्य सत्वरि घेतेल आपुल्या हाती ॥ श्री० ॥ ४ ॥
आम्हा मनुज म्हणवितां लाज वाटते चित्तीं ।
किति अम्हांपरिस ह्या स्वतंत्र अन्यहि जाती ॥
बघ अवलंबुनि हे दुसऱ्यावरि नच असती ।
कसे स्वछंदानेऽअहारविहार करिती ॥
हे स्वतंत्र कोकिल गाती । मधुरसे ।
बघ स्वतंत्र मृग जल पीती । गोडसें ।
किति स्वतंत्र खग मृग घेती । सुख कसे ।
भयभीतिविरहित स्वानंदानें रहाती ।
कधि चिंता त्यांना पडलि न पोटांची ती ॥ श्री० ॥ ५ ॥

—०—

पद ६ वें. चाल—आतां प्रेम करा ( भैरवी )

किति तरी अन्ता । बघशि भगवंता ॥ किति तरी अन्ता ॥ बघ० ॥
तुजविण ताता । जुलमीहि सत्ता । कवण वारिता । किति तरी०॥धृ०॥
नोकरशाही मस्त जहाली । परमावधि जुलुमाची झाली ।
हिंद जनांतें नुरला वाली । धांव पाव प्रभो सांप्रत कालीं ।
अवतार आता । घेइं त्वरें ताता । निवारि ही चिंता ॥ किति० ॥ १ ॥
हिंद-भूमिचें दैन्यचि हर्ता । गोब्राह्मण प्रतिपालन कर्ता ।
गरिब प्रजेचें कोड पुरविता । दे शिवछत्रपतीसम नेता ।
प्रभो एकदंता । हिंदीच्या ह्या चित्ता । देइं शांतता ॥ किति० ॥ २ ॥

### पद ७ वें. चाल—बहुत छळियलें.

स्वहित साधुया । बंधू शपथ घेउं या । हो स्वहित० । भागिनि शपथ० धृ० ॥ वाटावी ही लाजचि आपुल्याला । परसत्तेनें हो हिंद आपुला अधोगत झाला । तरि ऐक्य सकल, आदरूं, वंदनीय, गांधि निश्चया ॥ हो स्वहि० ॥ बंधू० ॥ १ ॥ मोहियलें आपुल्या देशाला । शतवर्षो-मध्यें विसरुनि गेलो आत्मस्वरूपाला । तरि पारतंत्र्य, नष्ट करुनि, देशों-न्नति, त्वरित करूं या ॥ हो स्वहित ॥ २ ॥ हिंदीच्या ह्या पाहुनि ऐक्याला । तैं गांधींचा आज परक्या हृदयीं चरका हा बसला । तरि हेंचि योग्य, सुलभ शस्त्र, घ्या करीं, स्वराज्य घ्यावया ॥ हो० ॥३॥ कष्टावीणें सौख्य लभे कवणा । घाव टाकिचे घ्यावे तेव्हां येइं देवपणा । तरि हिंद रणीं, शांतियुद्ध, खेळुनी, स्वधेय गाठुंया ॥ हो स्व० ॥ ४ ॥ शेवटि ही विनती गणराया । जी विघ्नें आमुच्या कार्यीं येतिल निरसी बा सदया । हें जाणुनी, सकल आर्य, करितसों कार्य मोरया हो ॥ हो स्वहित० ॥ ५ ॥

### पद ८ वें. चाल—मला मदन भासे हा मोहि मना ।

पंथ सत्य पाहे तूं जाई मनां । शांति धना घेइं, संगे मना ॥ध्रु०॥
भुलशिल भ्रमुनी, जरि भवरंगीं । चिरसुख मार्ग न परि यातना ॥तूं॥ १॥
स्वदेश बांधव, दैन्य हराया । हिंदैक्याच्या करि साधना ॥ तूं ॥ २ ॥
मानव जन्मा, येसी जरि तूं । परमार्थाचि हा करि कांहीं ना ॥ तूं ॥३॥
श्वाना परि हें, उदराभरणचि । व्यर्थ जिणें मग ज्ञानी जना ॥ तूं ॥ ४॥
आपुल्यामागें, स्वीकाराया । करुनी सन्मार्ग हा ठेवी जनां ॥ तूं ॥ ५॥
परवशता शृंखला, तुटाया । संघशक्तिची करि योजना ॥ तूं ॥ ॥ ६ ॥
लोकमान्य टिळकांच्या मागें । योग्य धुरिण अज गांधी जनां ॥ तूं॥७॥
नोकरशाही, नष्ट कराया । असहयोग हा लावी पणा ॥ तूं ॥ ॥ ८ ॥
स्वात्मरूपा, विसरुनि जासी । मवाळ बनसी तिळ लाज ना ॥ तूं ॥९॥
हिंदिचे आम्हि, मालक असुनी । पोटासाठीं परयाचना ॥ तूं ॥ १० ॥

स्वातंत्र्यास्तव प्राण द्यावया । सांगति पूर्वंज शिव बाजी ना ।। तूं ।।११।।
मालक मग आंजं मुळशीचे जन । करूं नका बा मूर्खपणा ।। तूं ।।१२।।
टाटाचा हा, काटा काढा । सत्याग्रहि व्हा रण कंदना ।। तूं ।। १३ ।।
गांधीचरक्यानें हा चरका । बसला परक्यांच्या बा मना ।। तूं ।। १४ ।।
सुतानें बा स्वर्गचि गांठीं । अनुभव प्रत्यक्षचि नयनां ।। तूं ।। १५ ।।
खादीवांचुनि, वाचूं नको बा । स्वराज्य जीवन या वणिना ।। तूं ।।१६।।
करुणासागर, विघ्नहरा आणि । करी सुफल हिंदी मनकामना ।।तूं।।१७।।

—:—

**पद नववें. चाल**—लाभो साधूची संगत.

जोंवरि स्वार्थी हें सरकार । तोंवरि गरिब प्रजा मरणार ।। धृ. ।।
गळेदाबि ही सांप्रत काळीं, कशी चालली जनतेची ।
देवा तारी हिंद सत्वरीं घेउनियां अवतार रे ।। ग. ।। १ ।।
वर्षशतें निःसत्वाचि केली सत्वशील ही हिन्द प्रजा ।
कसाबकरिं ही गायाचि पडली मुक्त कशी ? होणार रे ।।ग. २।।
वीसाव्या ह्या शतकामध्यें हिंदीची ही सुधारणा ।
चाकरकीर जी सत्ता गेली तिळ नच ती मिळणार रें ।। ग. ।।३।।
संपूर्ण जगाला न्यायनीतिला दारूबंदी मान्य रे ।
देशभक्त हे खटपट करितां त्यांनः हे छळणार रे ।। ग. ।।४।।
शकुनी लॉइट जॉर्जेनीती बेइमानीं किती पहा ।
वाढीं उसाचीं मालकास; रस नोकर हे पिणार रे ।। ग. ।।५।।
चालविली ही लूट हिंदिची पहिल्यापासून परक्यांनीं ।
वसवीला हो घटोत्कचाचा मायेचा बाजार रे ।। ग. ।। ६ ।।
एक अब्ज आणि वीस कोटिचे मालक सारे हिन्दी रे ।
किमर्थ यावर या उपऱ्यांची हुकमत ही असणार रे ।। ग. ।।७।।
कवी भिकूला भीकहि घाला राष्ट्रैक्याची हिंद रे ।
राखावा तुम्हि मान आपुला घेउन यांतिल सार रे ।। ग.।।८।।

**पद १० वें. चाल--चलारे गणराया वंदा.**

भारत वीरांनों बारे । पारतंत्र्य श्रृंखला तोडुनि बाहेर आणि यारे ॥धृ०॥
यारे स्वतंत्र होऊरे । नोकरशाही सत्तेचे जूं फेकुनि हें द्यारे ॥भा०॥१॥
द्यारे लक्ष पूर्ण द्यारे । तेहातिस कोटी जनां दडपिती स्वार्थी नोकररे ॥२॥
नोकर स्वार्थी हे सारे । मस्त जहाले शतसंवत्सर हिंदीवर बारे॥भा०॥३
बारे लबाड परकीयरे । काका थापा मारुनि करिती खुंटा बळकट रे ॥४॥
कट रे करुंया आपणरे । गांधींचा पण पूर्ण कराया चरका करिं घ्यारे॥५॥
घ्यारे भागिनिबंधू सारे । चरक्यानें ह्या परक्यांचे मनिं सुटले भय वारे ६॥
वारे सुटले हे आजरे । स्वातंत्र्याचे चोंहिकडे मग हिंद मागे कांरे ? ॥७॥
कांरे ? शूर वीर तुम्हि रे । श्रीशिवाजी गाजी बाजी वंशज मालुसरे८॥
सरसरे सुपुत्र तोहि पुढें । अजरामर सत्कीर्ति करुनी गेला केसरीरे॥९॥
सरी रे त्यांची यावीरे । हौस वीरहो धरुनि हिंदिचे सुपुत्र हे व्हारे॥१०॥
व्हारे मालक आसुनीरे-। गुलाम बंदे, सुशिक्षीत परि सत्ता नच करिं रे॥
करारे निश्चय म्हणुनीरे । खादिवीर व्हा बहिष्कार आणि अस्त्राचि योजारे ॥
योजिता युद्ध अशा परि रे । सशस्त्ररिपुपरि शरणचि येती रग ही सकलजिरे
जिरे रग ईश कृपेनें रे । गांधीं महात्मा राष्ट्र पुढारी आज्ञा वंदू रे॥१४॥
वंदू मंगलमूर्तीरे । हिंद स्वराज्या देउन सत्वर मंगल करि सारे ॥ १५ ॥

---

**पद ११ वें. चाल—कुणितरि दावा गे बाई.**

रेडिंग न्यायाचा काटा- । इंग्लिश ट्रेडमार्क ज्या मोठा ॥रे.॥धृ.॥
न्याय सरळ समतोल करिल हा प्रथमाचि बोभाटा ।
परि हा हिंदी वरतीं चढतां, झुकला मागे उलटा ॥रे.॥१॥
हिंद प्रजेला शांत करोनी संतोषा द्याया ।
आला यानें उघडा केला न्यायाचा बघ गट्टा ॥रे.॥२॥
क्रमाक्रमानें वर्णि लागली गोऱ्या रेडिंग भट्टा ।
आकंठ होइल अजन्म खाइल बैठे पेन्शन बेटा ॥रे०॥३॥

हिन्द परिस्थिति निवळायाला शहाणा पाठविला ।
अर्वाक बसला गढूळ करुनी लौकिक केला मोठा ॥ रे०॥४॥
ताटाखालिल मार्जीरांचा मवाळ.मतलबि( स्वार्थी ) पुट्टा ।
देशद्रोहापरांस काव्या कां ? नच भरती पोटा ॥रे०॥५॥
रेडा गाभणा नववा माहिना करिती हे स्तुतिपाठा ।
नामदारी, दिवाण बहादुरी, पदव्यांना नच तोटा ॥रे०॥६॥
हिंद फुटाफुट अखंड खटपट करुनी आजवरि लूटा ।
जाहिरनामे, राज्ञीवचनें सबही झाली झूटा ॥रे०॥७॥
पेटंट इंग्लिश पॉलीसी ही बलकट करण्या खुंटा ।
पदवी दानें, मिट्टा वचनें, फासें; तथ्यची घंटा ॥रे०॥८॥
शतवर्षे हें रक्त लागलें नोकरशाही ओंठां ।
हिन्द जनांच्या ऐश्वर्याचा [ परंपरेचा ] केला चटामटा ॥रे०॥९॥
ज्याचा मालचि हाल तयांचे न्याय इंग्रजी उलटा ।
हिंद जनांच्या पोटा घेई नोकरशाही चिमटा ॥रे०॥१०॥
सरळ न्याय समतोल करिल तरि घातचि होतो मोठा ।
गोऱ्या बाळांच्या चैनीला बसेल पूर्णचि फाटा ॥रे०॥११॥
काळा गोरा भेद करुनी माजविला हा तंटा ।
काळा कुट्टचि कलंक पारि अज पाश्चिमात्य ह्या राष्ट्रा ॥ १२ ॥
हिंद पिष्ट हें करुनी दसपट पगार गोऱ्यां, मट्टां ।
अर्ध पोटि अज हिंद सुशिक्षित सहन करिल कां ? चेष्टा ॥ १३ ॥
गोरी बाळे पुष्ट होउनी राहियल्या अवशिष्टा—।
माजि, गुजारा तेहातिस कोटी करितिल काय ? ही थट्टा ॥ १४ ॥
सरसकट ही उपरी बाळे चरावयाचा सट्टा ।
काय उचालिला ? हिंद प्रजेच्या करुनी हाल अपेष्टा ॥ १५ ॥
दडपशाहिने ( अंति जुलमाने ) हिंद क्षोभ हा आधिकचि घेई पेटा ।
त्यात जळुनि मग खाकचि होइल नोकरशाही सोटा ॥ १६ ॥

न्याय प्रिय तू रेडिंग पारि कां ? अनुभव देसी खट्टा ।
हिंद अकांक्षा नष्ट कराया } फिरवीसी वरवंटा ॥ रेडिंग ॥ १७ ॥
हिंद पूर्ण हा खच्चिकराया }
हिंदी पासुनि सुख व्हावे तरि प्रयत्न हा खोटा ।
सौजन्याच्या प्रेमभक्तिच्या [अद्वैताच्या] चोखाळा आणि वाटा॥रे०॥१८॥
गांधी आदि हे हिंद पुढारी मुक्त करुनी आणि भेटा ।
त्याच्या अनुसंधाने हिंदी स्वराज्य शकटाचे लोटा ॥ रे० ॥ १९ ॥
पेशवाइमधे निस्पृहन्याई प्रभुणेशास्त्री पव्या ।
गूण अलौलिक रेडिंगातरि आहे कां ? हा साठा ॥ २० ॥

---

**पद १२ वें चाल—** असा धरि छंद

प्रेम हें जोडा । मोडा हा द्वैत बखेडा ॥ धृ. ॥
अपहाराचा तुफान घोडा ।
अहंकार हा मस्तचि रेडा ।
मदांध ऐशा रंगिल बोकडा ।
बाहेर काढा । नातरि हे काढिति काढा ॥ प्रेम. ॥१॥
धृतराष्ट्रचि बघ राजा अंध ।
मंत्री शकुनी खुशालचंद ।
कौरव सारे स्वार्थि मदांध ।
न्यायनिवाडा । कैंचा ? मग सारा चिवडा ॥प्रेम. ॥२॥
प्रपंच दिधला परक्याहातीं ।
परक्यांची परि जंबुकनीती ।
कलह लावुनी गड्डा गिळिती ।
संगत सोडा । नातरि हो पूर्ण चुराडा ॥ प्रेम. ॥ ३ ॥
द्वैताचा हा हिंदित गुधडा ।
घालुनि करिती प्रेम बिघाडा ॥

स्वार्थसाधु हे बसविति पगडा ।
करिती उघडा । हा सारा हिंद लुबाडा ॥ प्रेम. ॥४॥
वर्णद्वेषाचे आज खूळ ।
व्यर्थ माजलें हिंदित सकळ ।
स्वार्थि मातले झाले प्रबळ ।
सोडा सोडा । अधमांची । संगत सोडा ॥ प्रेम ॥ ५॥
चारी वर्ण जरी हे जहाले ।
तयामुळें नच प्रेम बिघडलें ।
अहंपणाचें वारें शिरलें ।
अपस्वार्थानें घर बुडवीलें ।
दुर्गुण जाडा । सत्वरिं हा बाहेर काढा ॥ प्रेम. ॥ ६ ॥
चारी वर्णांतिल ह्या व्यक्ती ।
मूर्ती तितक्याची प्रकृती ।
नीतिबंधनें त्यजूं पाहती ।
कारण ताडा । स्वार्थानें सर्व बखेडा ॥ प्रेम. ॥ ॥७॥
देशद्रोही स्वार्थी चहाडा ।
कुऱ्हाड दांड्यांना ह्या झोडा ।
ज्यांच्या योगें स्वजना खोडा— ।
ह्मणे तो तोडा– । तरि हिंद, स्वराज्या जोडा ॥ ८ ॥
तेहातिस कोटींचा जर किल्ला ।
भक्तिबळानें बळकट केला ।
भेदनीतिवर चढवूं हल्ला ।
ठवूं वेढा । हा मत्लवि मत्छरपगडा ॥ ९ ॥

---

## पद १३ वें. चाल–हे शूर भारता ऊठ कैशी.

हे हिंद बंधुनो स्वराज्य सत्वरि प्रेम भाक्त जोडा ॥ सत्वरि० ॥ ध्रु० ॥
सूज्ञ जन हो अहंकार हा दुर्गुण मोठा जाडा ।
प्रथम रिपू हा बाहेर काढा कारे जो द्वैत बखेडा ॥ सत्वरि० ॥ १ ॥
अपमत्लाबि हे सार्थी षड्रिपू आपणावर हा पगडा— ।
बसवू बघती कशामुळें हे कारण कां नच ताडा ॥ सत्वरि० ॥ २ ॥
हिंद सर्व हा बुडावयाला कारण द्वैतचि बारे ।
आज तयाने परदास्यातचि बुडलो आपण सारे ॥ सत्वरि० ॥ ३ ॥
पेशवाइमध्यें बारभाइ हें सगळे शहाणे जहाले ।
स्वराज्य करिंचे द्वैत माजवुनि गमावुनी या बसले ॥ सत्वरि० ॥ ४ ॥
सत्ता कारेची गेली कैशी ? हिंदोनाते ही होई ।
यास्तव सारे प्रेम भाक्तिने ऐक्य करा लवलाही ॥ सत्वरि० ॥ ५ ॥
शरिराच्या ह्या एका भागा किंचित दुःख जरी ते ।
परी तयाने सर्व शरिर हे व्यापुनि शुष्काचे होते ॥ सत्वरि० ॥ ६ ॥
हिंदी तितके हिंदभूमिचे अवयव दिसाति निराळे ।
परि एकाते दुःखचि होता व्याकुळ होती सगळे ॥ सत्वरि० ॥ ७ ॥
सांप्रत हिंदीला ही गळवे पहा किती हो जडली ।
म्हणुनी मांत्रिक महात्म्याची योजनाच बघ केली ॥ सत्वरि० ॥ ८ ॥
हिंदी दुःखावरि गांधींच्या मंत्राचे करु मारे ।
कोणी आणखी लेपादिक ही औषधें म्हणती घ्यारे ।. सत्वरि० ॥ ९ ॥
दोन्हि उपाया पासुनि कांहिं अपाय नच तो पाही ॥
कार्य लौकरी तडीस जाया अधीक मदतचि होई ॥ सत्वरि० ॥ १० ॥
काथ्याकूटचि करूं नका द्वय उपाय ही योजारे ।
द्वैतामध्यें हिंदीचे हे दुःख बळावत आहे ॥ सत्वरि० ॥ ११ ॥
कोणी गांधी मंत्रचि घाला कोणी औषधी घ्यारे ।
कसेहि करुनी हिंद रोगे हा बाहेर झणि काढारे ॥ सत्वरि० ॥ १२ ॥
सान थोर हे जलौघ सारे सारिता मध्यें रहाती ।
शांत अशा मग सरिता प्रेमे क्षीराब्धीला मिळ्ती ॥ सत्वरि० ॥ १३ ॥
कांहीं सरिता पुर्ववाहिनी कांहीं पश्चिम पाही ।
परि सर्वांच्या अंतरिं हेतू एकचि निर्मल राही ॥ सत्वरि० ॥ १४ ॥
बहु प्रेमाने सकल ओघ आज सारितेला जे मिळती ।

परि त्या ओघां सांप्रतकालीं बंधारे बघ बसती ॥ सत्वरि० ॥ १५ ॥
त्या जल ओघां टाटाकंपनि बंधारे जरि देई ।
जोराचे ते सरितांमध्यें पाणी कैसे येई ॥ सत्वरि० ॥ १६ ॥
खेड्या पाड्यातिल जलओघाचि सरितांमध्यें याया ।
उत्सूकचि परि आडवील्यावरि कैसे ? येति मिळाया ॥ सत्वरि० ॥१७॥
सकल जलौघां वाचुनि सरिता वेगे धाव न घेई ।
प्रिय सिंधूला आलिंगाया कशी लौकरी जाई ॥ सत्वरि० ॥ १८ ॥
सूज्ञ जनांनी बहु प्रेमानी यातिल साराचि घ्यावे ।
एक जुटीने कार्य करूनी स्वराज्य झणि गाठावें ॥ सत्वरि० ॥ १९ ॥

---

**पद १४ वें चाल**-राम पाहिला कुणी-भैरवी.

लोकमान्य टिळक ( गांधि ) वचन । पूर्ण झणि करा तुम्हि पूर्ण करा ।
तरि तराल नच मराल हिंद उद्धरा ॥ तुम्हि० ॥ धृ० ॥
राजा धृतराष्ट्र बने । मंत्रि शकुनी मंत्राने ।
शांति धर्म हिंद मनें । क्षुब्धला धरा ॥ तुम्हि० ॥ १ ॥
गांधींचे तत्त्व खरे । आचरिता दैन्य हरे ।
आजवरी फसलो पुरे । जागे व्हा जरा ॥ तुम्हि० ॥ २ ॥
महात्मा गांधीजी । व्रत सांगति थोर आजि ।
आचारिता येइं सहजी । स्वराज्य तें घरा ॥ तुम्हि० ॥ ३ ॥
थोर ( धानिक ) अभीमान धरा । देशकार्यी धुरिण वरा ।
हिंद दैन्य सकल हरा । नांव झणि करा ॥ तुम्हि० ॥ ४ ॥
उद्योगी जन सगळे । पोट भरी परि न मिळे ।
काळ जीत स्वजन जळे । लक्ष द्या जरा ॥ तुम्हि० ॥ ५ ॥
संपांची साथ नविन । उद्भली काय म्हणून ? ।
नच आणा अन्य विघ्न । आपुल्या ( हिंदहो ) घरा ॥ तुम्हि० ॥ ६ ॥
पोट भरी धनिक खाइ । त्यास कोण खाऊ देइ ? ।

संकट हें सर्वांही । दूर आणि करा ।। तुम्हि० ।। ७ ।।
भुकी स्वजन हें मरती । धनिक सुखां अनुभविती ।
दुर्लक्षाचे पारे कारेती । सकळ मग मरा ।। तुम्हि० ।। ८ ।।
म्हणुनि धनिक पुढती या । राष्ट्र धुरिण ( स्तंभ ) म्हणवा या ।
दवडु नका क्षण वाया । संकटा हरा ।। तुम्हि० ।। ९ ।।
जारी गृह जळते । स्वस्थ बसुनि कां सरते ? ।
तारा तै स्वजनाते (आपणाते) । करुनिया त्वरा ।। तुम्हि० ।। १० ।।
हिंद धान्य अन्य देशी । ताळतंत्र नच त्यासी ।
मालक तुम्हि उपवासी । ध्यान हे धरा ।। तुम्हि० ।। ११ ।।
माते स्तनि दुग्ध नुरे । धेनु माय पुरुनि उरे ।
परि त्यांचा प्राण फिरे । घेति चरचरा ।। तुम्हि० ।। १२ ।।
ह्या परि गो दुग्धामृत । ज्यावरि अम्हि हिंद जगत ।
परि त्यांच्या रक्षणार्थ । नुरविली धरा ।। तुम्हि० ।। १३ ।।
जगण्याची जी साधन । मुख्य अन्न दुग्धपान ।
पर सगळे लुटिति पूर्ण । काय ही तऱ्हा ? ।। तुम्हि० ।। १४ ।।
आमुचे हे आसुनि अम्हां । भोगाया बंदि पहा ।
उलट न्याय कठिण अहा । होय ईश्वरा ।। तुम्हि० ।। १५ ।।
पाश्चिमात्य उलटमंत्र । कलह मातले विचित्र ।
व्यक्ति सौख्य घे स्वतंत्र । भुरळ दुर करा ।। तुम्हि० ।। १६ ।।
कलहाचे बी रुजवुनि । मौज बघे लांब दुरुनि ।
जंबुक कीं नारदमुनि । शिष्य हा पुरा ।। तुम्हि० ।। १७ ।।
नारीनर सकल व्यक्ति । मुक्त स्वैर होउ बघति ।
ऐक्य प्रेमबंध त्यजिते । नाश हो पुरा ।। तुम्हि० ।। १८ ।।
हिंद ऐक्य नष्ट करी । खटपट ही बहुत परी ।
करणे कोण पोटभरी । उमज घ्या जरा ।। तुम्हि० ।। १९ ।।
श्रीशिवाजी गाजे बाजी । शूरवीर वंश आजि ।
तुकड्या स्तव हांजि हांजि । फांकणे भरा ।। तुम्हि० ।। २० ।।
दास सकल परक्याचे । दास गृही स्वस्त्रीचे ।

धि:क्‌जिणे नर कैचे ? (हिंदीचे) वृषभ परि बरा ॥ तुम्हि० ॥२१॥
अपसांतिल कलहाला । जरूर जरूर तुम्हि हलका ।
शतवर्षाधिक मुकला । सौख्य ते वरा ॥ तुम्ह० ॥ २२ ॥
चारि वर्ण पोट जाती । देशकार्यि सकल जमाति ।
ऐक्याची स्मारक तिथि । विजय दिन स्मरा ॥ तुम्हि० ॥ २३ ॥
एके कालिं राष्ट्र धुरिण । साधुसंत बहुत वर्ण ।
परि त्यांचे ऐक्य पूर्ण । आठवा जरा ॥ तुम्हि० २४ ॥
आजवरी जे अशक्य । हिंदु मुसल्मान सख्य ।
परि कलह नविन शुष्क । ऐक्य झणि करा ॥ तुम्हि० ॥ २५ ॥
कलहानें राज्य बुडले । कलहाने आर्य मेले ।
कलहाने पर जगले । जागे व्हा जरा ॥ तुम्हि० ॥ २६ ॥
हिंद देश इक्षु दंड । रस त्याचा परि अखंड ।
गोड म्हणुनि बहु उदंड ; अन्य ने घरा ॥ तुम्हि० ॥ २७ ॥
ज्याचा हा माल त्यास । हाल काय ? रस न वास ।
बैलोबा धनि कशांस ? । वाढि पत्करा ॥ तुम्हि० ॥ २८ ॥
रक्षक गाडि ठेविथला । शीर जोर परि झाला ।
गृह बळकावुनि बसला । न्याय हा पुरा ॥ तुम्हि० ॥ २९ ॥
यासि संघ शक्तिने । गांधि मंत्र तंत्राने ।
बद्ध करूं पूर्णपणे । सकल तरि तरा ॥ तुम्हि० ॥ ३० ॥
शस्त्राविण होय सहज । कठिण कार्य हिच मौज ।
तरी हिंद सकल आज । ऐक्य दृढ करा ॥ तुम्हि० ॥ ३१ ॥
ऐक्यसंघ शस्त्र करि । बहिष्कार अस्त्र जरी ।
घेउनिया करूं स्वारी । विजय ये घरा ॥ तुम्हि० ॥ ३२ ॥

## विजयादशमीपद्य.

**पद १५ वें. चाल–' फुलें सुवासिक हीं '**

दसरा सण येई । विजय दिन । दसरा सण पाहीं ।
वार्षीक । हिंद जनलोक । प्रेमपूर्वक । भेट घेई ॥द०॥ध्रु.॥
हे एक जुटीनें सीमोल्लंघन करुया ।
शमिआर्चन करुनी स्वराज्यधन मिळवूंया ।
ही देवब्राह्मणा स्वजना भेटी द्या, या ।
विनति सुजनां ही । करी ही । विनती० ॥वार्षीक. ॥१॥
हे सान–थोर–जन–चिंता–दैन्य हरा, या ।
हा महर्गतेचा दावाग्नी विझवा या ।
हें तनमन तैः धन अर्पू स्वदेशकार्या ।
विनतीसुजना ही । करी ही । विनति. ॥ वार्षी०॥२॥
ही विफलचि झाली लोकमान्यशिष्टाई ।
म्हणुनि हो गांधिव्रत सांग करूं लवलाही ।
हें कठिण दिसें परि स्वराज्य याविण नाहीं ।
विनती सुजना ही । करी ही । विनती. ॥ वा. ॥ ३॥
हा धुतला सारा हिंद देश परत्रयांनीं ।
करिं आवळा दावुनि कोहळा टाकिति वदनीं ।
ही घटोत्कचाची माया पसरिलि ज्यांनीं ।
धनधान्य विपुल तैं गोधन नेलें हिरुनी ।
विनती सुजनां ही । करी ही । विनती ॥ वा. ॥ ४ ॥
ह्या जहाल्या गोष्टी परत जरी ना येती ।
परि पुढील मार्गचि करणें आपुल्या हातीं ।
प्रतिकार कराया एकीनें व्हा पुढती ।
विनती सुजना ही । करी ही । विनती. ॥ वा. ॥ ५ ॥
आज गांधींचा हा कामधेनुसम चरका ।
फिरवितां घ्यावया माल न लागे परका ।

यापरी बंधुनों [ सुजनहो ] राखा आपुला पैका ।
हें आहे तुम्हां हातीं । सांप्रती । आहे. ॥ वा. ॥ ६ ॥
किति सुवक विदेशी माल परी नच घेणें ।
ही जाडीभरडी खादि स्वदेशी लेणें ।
ते हिंदधान्य अधि परदेशीं नच देणें ।
हें आहे तुम्हां हातीं । बंधुनों । आहे. ॥ वा. ॥ ७ ॥
त्यापरी मुख्य गृहिं गाय माय ही असणें ।
तरि गांवोगांवीं मोफत जादा कुरणें ।
पीर खरेदिचें हें धनिकांनीं यश घेणें ।
विनती धनिकां ही।सांप्रती। विनती सुजनांही ॥ वा. ॥८॥
धनधान्य गोधन रक्षूं यापरि आज ।
तरि महर्घतेची चिंता जाइल सहज ।
दृढ निश्चय करुनी विजयदिनीं व्हा सज्ज ।
स्वराज्य तरि हातीं । बंधुनों । स्वरा. ॥ वा. ॥९॥
ही स्वानुभवानें स्वयंस्फूर्तिनें रचिली ।
ती पद्यभेट आंज हिंदबंधुतें दिधली ।
तरि मधूर परिमल यांतिल ध्या या काळीं ।
नारोसुत विनती । करींही । नारोसुत विनती ॥ वा. ॥१०॥

समाप्त.



# आश्रयदात्यांस सविनय विनंति

खालीलप्रमाणें

पुस्तकांचें उत्पन्न 'गोरक्षण कार्याकडे' आणि मौजे विंझर
गावांतील सार्वजनिक रस्त्यानें जाणारे येणारे वाटसरु
व गाई बैलादि मुक्याजनावरांचे सोईसाठीं व
उन्हाळ्यांत गांवांत पाण्याची तूट येते तेव्हां
मुख्यतः गाई म्हशी व शेतीचे बैलास.

**पाणी पिण्यास मिळत नाहीं.**

म्हणून विहिरीचें सुरु केलेले काम पैशाचे अभावीं अर्ध-
वट पडून राहिलें तें पुरें करण्यासाठीं खर्च करणें आहे.

**करितां**

सर्व पुस्तकासंबंधानें हक्क कर्त्यानें राखून ठेविले आहेत.

संगीतकाव्यव्यासंगी भि. ना. जोगदेव.

**यांची**

राष्ट्रैक्य साधनास पुष्टी देणारीं व गायनप्रिय रसिकास
करमणूक होऊन जनमनें उल्हसित करणारीं

| पुस्तकें | विक्रीस आहेत तीं | किंमत |
|---|---|---|
| १ | मकर संक्रांतीची भेट उर्फ मनोरंजक हलवा ...... | ८१ |
| २ | सचित्र लोकमान्यांचे स्वागतोत्सव प्रसंगानिमित्य सं. भेट | ८१ |
| ३ | हिंदपुत्रांचें सध्याचें कर्तव्य उर्फ राष्ट्रैक्य साधन ...... | ८२ |
| ४ | राष्ट्रैक्यसाधन मेळ्याचीं पदें .................. | ८१८६ |

चारी पुस्तकें एकदम घेऊन आश्रय देणारांस किं. ...... ८४